**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय**

**जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती**

**जिल्हा उद्योग मित्र समिती सभा**

**दिनांक ८/३/२०१०**

**सकाळी ११.३० वाजता**

**स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

## जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

**मा. जिल्हाधिकारी, अमरावती महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक ८/३/२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न होणा-या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची टिपणी.**

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | दिनांक २१/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. | | |
| २. | दिनांक २१/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | | |
| | १. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून रु. १०.५० प्र.घ.मि. या दराने औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याकरीता लागणारी जलवाहिनी इत्यादीची सुविधा पुरविण्या बाबतचा प्रस्ताव मऔविम, मुंबईला पाठविण्यांत आला असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घरगुती वापराच्या दराऐवजी वाणिज्यिक दर आकारण्यांत येईल, असे कळविले आहे.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे सिडकोद्वारा आकारण्यांत येत असलेल्या दराबाबतची माहिती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती हे सभेला देतील. | मऔविम, अमरावती.<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | २. एमआयडीसी अमरावती येथे उद्योगासाठी सब-स्टेशन मंजूर करणेबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी अमरावती येथे भविष्यात येणा-या उद्योग घटकांची विद्युत पुरवठयाची गरज लक्षांत घेता सद्य:स्थितीत असलेला विद्युत भार वाढविण्यांत यावा अशी औद्योगिक संघटनेची मागणी होती. तसेच प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, मराविविकंम (ओ अँड एम), अमरावती यांना पत्र दि. १६/१२/०८ अन्वये मराविविकंमच्या मुलभूतसोयी योजना अंतर्गत सदर सब-स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली आहे.<br>मागील सभेत मराविविकंचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली होती की ३२ केव्हीए सब स्टेशन अस्तित्वात आहे व अतिरिक्त १० के.व्ही.ए. सब-स्टेशनची उभारणी सुरु आहे, अशा परिस्थितीत नवीन सब-स्टेशनची आवश्यकता पडणार नाही.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, मराविविकंम,अमरावती हे सदर सब-स्टेशनची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबतची माहिती सभेला देतील. | मऔविम, अमरावती.<br><br>मराविविकंम, अमरावती. | . |
| | ३. नांदगांवपेठ एमआयडीसी मधील भूखंड उपलब्ध करण्याबाबत तसेच स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | नांदगांवपेठ पंच तारांकित औद्योगिक वसाहतीत भूखंड मिळण्याकरीता २५०-३०० प्राप्त अर्जामध्ये दिल्लीच्या उद्योजकांचे अर्ज जास्त असल्यामुळे सदर अर्ज मऔविमद्वारा प्रलंबीत ठेवण्यांत आलेले आहेत.<br>सभेत ठरल्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी यांचे दिनांक ५/१२/२००८ चे अर्ध शासकिय पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना स्थानिक उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे, अशी विनंती करण्यांत आली होती.<br>मागील सभेला प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती हे उपस्थित नसल्यामुळे सदर विषयाबाबतची प्रगतीची माहिती सभेला होऊ शकली नव्हती. प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती हे सभेला पुढील प्रगतीची माहिती देतील. | मऔविम, अमरावती | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | ४. मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागेचे वाटप करण्याबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती | मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला सद्य:स्थितीतील उद्योगाला सुरळीत चालु ठेवण्याकरीता व भविष्यामधील विस्तारीकरणाकरीता अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागा वाटप करण्यांत यावी, याबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक २४/३/२००६ चे पत्रान्वये विनंती केलेली होती.<br>उद्योगाद्वारे त्रुटीची पूर्तता करण्यांत आल्याची माहिती देण्यांत मागील सभेत देण्यांत आली होती.<br>प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती हे सभेला पुढील प्रगतीची माहिती देतील. | मऔविम, अमरावती | |
| | ५. अंजनगांव सुर्जी येथील जिनींग फॅक्टरी लोड शेडींग मुळे अडचणीत आल्यबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | अंजनगांव सुर्जी येथील जिनींग फॅक्टरी येथे लोड शेडींगमुळे सदर उद्योग अडचणीत आलेला आहे, करीता लोडशेडींगचे वेळापत्रक तपासून त्यात बदल करावा, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे अधिक्षक अभियंता, मराविविकंम, अमरावती यांना औद्योगिक संघटनेच्या मागणीप्रमाणे लोडशेडींगचे वेळापत्रक तपासून त्यांत बदल करण्या संबंधात कार्यवाही करण्याविषयी कळविण्यांत आले आहे.<br>अधिक्षक अभियंता, मराविविकंम, अमरावती हे सदर विषया संबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती सभेला देतील. | मराविविकंम, अमरावती | |
| | ६. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | गोपाल नगरकडील ट्रक वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सिपना कॉलेज ते एमआयडीसी हा रस्ता करण्यांत यावा, अशी मागणी औद्योगिक संघटनने केली होती.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव खारीज करण्यांत आल्यामुळे नवीन प्रस्ताव महानगरपालिका, अमरावती यांनी भू संपादन विभागास सादर करावयाचा होता.<br>मा. उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालीका,अमरवती हे सभेला पुढील प्रगती विषयी माहिती देतील. | महानगर पालिका , अमरावती. | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्यःस्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | ७. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा बंदोबस्त करण्याबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | स्वच्छता राखण्यासंदर्भात महानगरपालिकेची महत्वाची भूमिका आहे. करीता स्वच्छता मोहिम राबविण्यांत यावी, तसेच मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याबाबतसुध्दा योग्य ती मोहिम राबवावी जेणेकरुन अटकाव होऊन अशा घटना होणार नाही, अशी सुचना मागील सभेत करण्यांत आली होती.<br>उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका हे सभेला सद्यःस्थिती विषयी माहिती देतील. | महानगर पालिका, अमरावती. | |
| | ८. इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस मिळणेबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती. | पुरवठा विभागास एकूण १३ उद्योग घटकांना केरोसीन वाटपाकरीता प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. तसेच पुन्हा दि. १२/११/२००८ रोजी प्रस्ताव यादीसह सादर करण्यांत आलेला आहे.<br>रॉकेलच्या पुरवठ्याबाबत डिलरशीपचा प्रस्ताव शासनास दिनांक १८/६/२००९ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती हे सभेला पुढील प्रगतीची माहिती देतील. | पुरवठा विभाग, अमरावती. | |
| | ९. सुपर एक्सप्रेस बायपास एमआयडीसी टी पॉईंटवर आरटीओचे अधिका-याद्वारे वाहन तपासणी करण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरा येथे करण्या बाबत. | अमरावती एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजक. | औद्योगिक संघटनेने माहिती दिली होती की वाहन तपासणी मध्यंतरी बंद करण्यांत आली होती, ती आता पुन्हा सुरु करण्यांत आली आहे.<br>मागील सभेत वाहनांची तपासणी सदर टी पॉईंटपासून १०० ते २०० मिटर अंतर पुढे करावी, अशी सूचना परिवहन विभागाच्या प्रतिनिधी यांना करण्यांत आली होती व त्यांनी ती मान्य केली होती. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती हे त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती सभेला देतील. | प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती | |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सद्य:स्थिती | संबंधित कार्यालय | सभेचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| | १०. ऑईल मिलचे क्लस्टर अमरावती येथे निर्माण करणेबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती. | उद्योग संचालनालय, मुंबईचे पत्र दि. ५ फेब्रुवारी २००७अनुसार एसआयसीडीपी योजने अंतर्गत तेल गिरण्याचे क्लस्टरची निवड करण्यांत आलेली आहे. तसेच इंजिनियरींग, रेडीमेड गारमेंट, प्लॅस्टीक या उद्योगांचा सुध्दा क्लस्टरकरीता विचार व्हावा अशी चर्चा करण्यांत आली होती. तसेच बांबुवर आधारीत उद्योगाचे क्लस्टर होऊ शकते.<br>औद्योगिक संघटनानी सदरील क्लस्टरकरीता येणा-या खर्चामध्ये आपला वाटा द्यावा. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशन, अमरावती. | |
| ३. | मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळवर येणारे विषय. | | | | |
| | १. एमआयडीसी एरीया अमरावती येथे राष्ट्रीयकृत बँकेची शाखा उघडण्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी एरीया अमरावती या भागांत एमआयडीसी, महावितरण, बीएसएनएल ची कार्यालये तसेच तीन इंजिनियरींग कॉलेजेसे, विदर्भ प्रिमियर हाऊसींग कॉलोनी व अन्य हाऊसींग कॉलोनी आहेत. करीता एमआयडीसी येथील सामुहिक सुविधा केंद्र येथे बँकेची शाखा उघडल्यास तेथील परिसरांतील लोकांच्या दृष्टीने बँकेची शाखा उघडण्यांत यावी, अशी मागणी औद्योगिक संघटनेने दिनांक २१/१/२०१० चे पत्रान्वये केली.<br>कार्यालयीन पत्र दिनांक ९/२/२०१० अन्वये अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, अमरावती यांना यादृष्टीने पाठपुरावा करण्याची विनंती करण्यांत आली आहे. | अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, अमरावती | |

महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव, जि.उ.मि.,
अमरावती.

महाराष्ट्र शासन

उद्योग संचालनालय

जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

जिल्हा उद्योग मित्र समिती सभा

दिनांक ८/३/२०१०

सकाळी ११.३० वाजता

स्थळ :- जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती

## जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

मा. श्रीमती रिचा बागला, आय.ए.एस., जिल्हाधिकारी, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दिनांक ८/३/२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे. | | श्री. जी. ओ. भारती, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी उपस्थितांचे स्वागत करुन मा. श्रीमती रिचा बागला, आय.ए.एस., जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या परवानगीने जिल्हा उद्योग मित्र समिती सभेच्या कामकाजास सुरुवात केली.<br>महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी दिनांक २१/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त सर्व सदस्याना व संबंधिताना पाठविण्यात आले असून ते सभेच्या मंजूरातीसाठी ठेवलेले आहे. कोणीही हरकत उपतस्थित न केल्यामुळे सर्व संमतीने इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.<br>सभेला उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे. | |
| २. | दिनांक २१/१/२०१० रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताप्रमाणे कार्यवाहीचा आढावा :- | | | |
| | १. एमआयडीसी अमरावती येथे पुरविण्यांत येत असलेले पाणी पिण्यायोग्य नसल्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु. १०.५० प्र.घ.मि. या दराने औद्योगिक क्षेत्राला पाणी पुरविण्याकरीता लागणारी जलवाहिनी इत्यादीची सुविधा पुरविण्या बाबतचा प्रस्ताव मऔविम, मुख्यालय, मुंबईला मंजूरीकरीता पाठविण्यांत आलेला असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घरगुती वापराच्या दराऐवजी वाणिज्यिक वापराचा दर आकारण्यांत येईल, असे कळविले.<br>मागील सभेत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांनी माहिती दिली की याबाबतचा प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यांत आलेला आहे. या शिवाय सिडकोद्वारा आकारण्यांत येत असलेले दर लागू करणेबाबत शक्यता पडताळून पाहण्यांत येत आहे.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी कार्यवाही होत नसल्याबद्दल व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती सभेला उपस्थित नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे प्रतिनिधी यांना सुचना केली की त्यांनी त्यांचे वरीष्ठ कार्यालयाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करावी. | मऔविम<br><br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | २. एमआयडीसी अमरावती येथे उद्योगासाठी सब-स्टेशन मंजूर करणेबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी अमरावती येथे भविष्यात येणा-या उद्योग घटकांची विद्युत पुरवठयाची गरज लक्षांत घेता सद्य:स्थितीत असलेला विद्युत भार वाढविण्यांत यावा अशी औद्योगिक संघटनेची मागणी होती. तसेच प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांनी कार्यकारी अभियंता, मराविविकंम (ओ अँड एम), अमरावती यांना पत्र दि. १६/१२/०८ अन्वये मराविविकंमच्या मुलभूतसोयी योजना अंतर्गत सदर सब-स्टेशनचा प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली आहे.<br>मराविविकंचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की ६६ केव्हीए सब स्टेशन अस्तित्वात आहे व लकरच साधारणत: एक वर्षाच्या काळात तेथे क्षमता वाढवून ३० एमव्हीए सब-स्टेशन उभारण्यांत येत असल्यामुळे भविष्यात विद्युत पुरवठ्याबाबत अडचण राहणार नाही.<br>करीता मा. अध्यक्ष महोदया यांनी सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, अशी सुचना केली (विषय बंद). | मऔविम<br><br>मराविविकंम |
| | ३. नांदगांवपेठ एमआयडीसी मधील भूखंड उपलब्ध करण्याबाबत तसेच स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | नांदगांवपेठ पंचतारांकीत औद्योगिक वसाहतीत भूखंड मिळण्याकरीता २५०-३०० प्राप्त अर्जामध्ये दिल्लीच्या उद्योजकांचे अर्ज जास्त असल्यामुळे सदर अर्ज मऔविमद्वारा प्रलंबीत ठेवण्यांत आलेले आहेत. मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सुद्धा अर्ध शासकिय पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांना उपलब्ध भूखंडामधून स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे यादृष्टीने कार्यवाही करण्याची विनंती केलेली आहे.<br>तसेच मऔविम, मुंबई कार्यालयाकडून मंजूरी लवकरच पाठविण्यांत येत आहे व एक महिन्यात भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यांत येईल, अशी माहिती मागील सभेत देण्यांत आली होती<br>मागील सभा व या सभेला विभागीय अधिकारी, मऔविम, अमरावती सभेला उपस्थित नसल्यामुळे सदर विषया संबंधात चर्चा होऊ शकली नाही, या बाबत मा. अध्यक्ष महोदया यांनी नाराजी व्यक्त केली व मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.म., मुंबई यांना उपलब्ध भूखंडामधून स्थानिक लोकांना भूखंडाचे वाटप करण्यांत यावे याबाबत अर्ध शासकिय पत्र लिहिण्याची सुचना केली. | मऔविम |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ४. मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाला अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागेचे वाटप करण्याबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती | मे. आनंद डिस्टीलरीज प्रा. लि., केकटपूर, ता. व जि. अमरावती या उद्योग घटकाने दिनांक २९/१२/२००८ चे पत्रान्वये असे कळविले होते की सदर उद्योग घटकाला सद्य:स्थितीतील उद्योगाला सुरळीत चालु ठेवण्याकरीता व भविष्यामधील विस्तारीकरणाकरीता अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्र, अमरावती येथील ७ एकर जागा वाटप करण्यांत यावी. याबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक २४/३/२००६ चे पत्रान्वये विनंती केलेली होती. कार्यालयीन पत्राद्वारे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, अमरावती यांना दिनांक ७/१/२००९ चे पत्रान्वये सद्य:स्थिति कळविण्याची विनंती करण्यांत आलेली आहे<br>मऔविमचे प्रतिनिधी यांनी माहिती दिली की सदर उद्योग घटकास पत्राद्वारे त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यांत आले होते, त्याप्रमाणे त्रुटीची पूर्तता करण्यांत आली आहे व आता प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यांत आला आहे. करीता सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, अशी सुचना मा. अध्यक्ष महोदया यांनी केली. | (विषय बंद) |
| | ५. अंजनगांव सुर्जी येथील जिनींग फॅक्टरी लोड शेडींग मुळे अडचणीत आल्यबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | अंजनगांव सुर्जी येथील जिनींग फॅक्टरी येथे लोड शेडींगमुळे सदर उद्योग अडचणीत आलेला आहे, करीता लोडशेडींगचे वेळापत्रक तपासून त्यात बदल करावा, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली.<br>मागील सभेत ठरल्याप्रमाणे अधिक्षक अभियंता, मराविविकंम, अमरावती यांना औद्योगिक संघटनेच्या मागणीप्रमाणे लोडशेडींगचे वेळापत्रक तपासून त्यांत बदल करण्या संबंधात कार्यवाही करण्याविषयी मा. अध्यक्षांनी सुचविले होते.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी पुन्हा उद्योगाचे सोयी नुसार वेळापत्रकात बदल करण्याची सुचना केली. | मराविविकंम |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ६. सिपना कॉलेज ते एमआयडीसी नवीन रस्त्याबाबत तसेच गोपाल नगर ते बडनेरा हा मार्ग जड वाहतुकीसाठी बंद करण्या बाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | गोपाल नगरकडील ट्रक वाहतुकीचा भार कमी करण्याच्या दृष्टीने सिपना कॉलेज ते एमआयडीसी हा रस्ता करण्यांत यावा, अशी मागणी औद्योगिक संघटनने केली होती. या मागणीच्या संदर्भात बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याची कार्यवाही महानगरपालिका, अमरावतीमार्फत सुरु आहे.<br>बडनेरा रोड ते मिनी बायपास रोड असा एक किलोमिटर रस्ता अधिग्रहण करण्याचा प्रस्ताव भूसंपादन विभागास सादर करण्यांत आला होता. तथापि त्रुटीमुळे मागील प्रस्ताव हा खारीज करण्यांत आलेला आहे. करीता सदर रस्ता अधिग्रहण करण्यास्तव मागणी नोंदविण्याकरीता पुन्हा भूसंपादन विभागास प्रसताव सादर करावयाचा होता.<br>सभेला उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका, अमरावती हे उपस्थित नसल्यामुळे सदर विषयावर निर्णय घेण्याचे दृष्टीने चर्चा होऊ शकली नाही. सदर अनुपस्थितीबाबत मा. अध्यक्ष महोदया यांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका, अमरावती यांना सभेला उपस्थित राहण्याबाबत पत्र लिहिण्याची सूचना केली. तसेच पुढील सभेस TLR यांना बोलवावे असेही सुचविले. | महानगरपालिका, अमरावती. |
| | ७. एमआयडीसी परिसर व सातुर्णा औद्योगिक वसाहत परिसरात डुकराचा बंदोबस्त करण्याबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंड. असो. अमरावती | एमआयडीसी परिसर येथे स्वच्छता राखण्यासंदर्भात महानगरपालिकेची महत्वाची भूमिका आहे. करीता स्वच्छता मोहिम राबविण्यांत यावी, तसेच मोकाट गुरांचा बंदोबस्त करण्याबाबतसुध्दा योग्य ती मोहिम राबवावी जेणेकरुन अटकाव होऊन अशा घटना होणार नाही, अशी सुचना अमरवती महानगरपालिकाचे प्रतिनिधी यांना मागील सभेत करण्यांत आली होती.<br>उपायुक्त (प्रशासन), महानगरपालिका हे सभेला उपस्थित नसल्यामुळे मा. अध्यक्ष महोदया यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली व त्यांना अर्ध शासकिय पत्राद्वारे याबाबत कळविण्याची सुचना केली. | महानगरपालिका |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | ८. इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस मिळणेबाबत. | अमरावती डिव्हीजनल इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती. | इंडस्ट्रीयल केरोसीन लायसेंस निर्गमित करणे शासनाने बंद केले आहे, ते देणे पूर्ववत सुरु करण्यांत यावे, अशी मागणी औद्योगिक संघटनेने केली होती. पुरवठा विभागास एकूण १३ उद्योग घटकांना केरोसीन वाटपाकरीता प्रस्ताव जिल्हा उद्योग केंद्राद्वारा दि. १६/१/२००६ रोजी सादर करण्यांत आलेला होता. दि. ४/११/२००८ रोजी झालेल्या सभेत ठरल्याप्रमाणे मागील सर्व संदर्भासह पुन्हा दि. १२/११/२००८ रोजी प्रस्ताव यादीसह त्यांना सादर करण्यांत आलेला आहे.<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती यांनी मागील सभेत माहिती दिली की उद्योगांना रॉकेलच्या पुरवठ्याबाबत डिलरशीपचा प्रस्ताव शासनास दिनांक १८/६/२००९ रोजी सादर करण्यांत आलेला आहे. तथापि परवाना नसल्यामुळे वाटपाबाबत कार्यवाही होऊ शकली नाही.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी माहे एप्रील २०१० पासून परवाना देणे सुरु करण्यांत येईल, अशी माहिती दिली. | पुरवठा विभाग, अमरावती. |
| | ९. सुपर एक्सप्रेस बायपास एमआयडीसी टी पॉईंटवर आरटीओचे अधिका-याद्वारे वाहन तपासणी करण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरा येथे करण्या बाबत. | अमरावती एमआयडीसी क्षेत्रातील उद्योजक. | एमआयडीसी क्षेतातील उद्योजकांनी दिनांक १८/७/२००९ चे पत्रान्वये निवेदन सादर केले होते की सुपर एक्सप्रेस रोडवरील टी-पॉईटवर आरटीओ अधिका-याद्वारा वाहने तपासणीसाठी थांबविली जातात. त्यामुळे एमआयडीसीमध्ये ये जा करणा-या वाहनाना अडथळा निर्माण होतो. तसेच त्यामुळे एमआयडीसीमधील कच्चामाल व पक्क्या मालाची ने आण करणा-या वाहन चालकांना त्यांच्याजवळ आवश्यक ती कागदपत्रे असूनसुध्दा आरटीओ अधिका-यांच्या तपासणीचा त्रास होतो, त्यामुळे ते एमआयडीसीमध्ये येण्याचे टाळतात. करीता सदर टी पॉईंटवर वाहने थांबविण्याऐवजी एमआयडीसी नाल्याजवळ बेलोरामध्ये चेकपोस्ट आहे, तेथे वाहने थांबवावीत, असे सूचविले होते.<br>प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांनी सभेला माहिती दिली की मागील सभेत ठरल्याप्रमाणे वाहनांची तपासणी सदर टी-पॉईटच्या पुढे १०० ते २०० मिटर अंतरावर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यांत आले आहे.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी उपरोक्त आदेशाचे पालन होत आहे किंवा कसे याची तपासणी करावी अशी सुचना केली. तसेच सदर विषय सभेच्या विषयसूचीवरुन कमी करण्यांत यावा, अशी सुचना केली. (विषय बंद). | परिवहन विभाग, अमरावती. |

| अ.क्र. | विषय | विषय कोणी मांडला | सभेतील चर्चा व निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | १०. ऑईल मिलचे क्लस्टर अमरावती येथे निर्माण करणेबाबत. | जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती. | अमरावती येथे उद्योगाचे क्लस्टर निर्माण करण्याकरीता एसआयसीडीपी योजनेअंतर्गत तेल गिरण्याचे क्लस्टरची निवड करण्यांत आली आहे. तथापि ऑईल मिलचे क्लस्टर शक्य नसल्यास नवीन उद्योग जसे मार्बल/ ग्रेनाईट, प्लॅस्टीक इत्यादींचे क्लस्टर, इंजिनियरिंग वर्कशॉप, रेडीमेड गारमेंट या उद्योगांच्या क्लस्टरकरीता औद्योगिक संघटनेने पुढाकार घ्यावयास पाहिजे.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी क्लस्टर निर्माण करण्याकरीता औद्योगिक संघटना यांनी त्यांचा आर्थिक सहभाग बाबत त्वरीत निर्णय घ्यावा व एक महिन्यात प्रस्ताव तयार करावा, अशी सुचना केली. | औद्योगिक संघटना, अमरावती |
| | ११. एमआयडीसी एरीया अमरावती येथे राष्ट्रीयकृत बँकेची शाखा उघडण्याबाबत. | एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसियेशन, अमरावती. | एमआयडीसी एरीया अमरावती या भागांत एमआयडीसी, महावितरण, बीएसएनएलची कार्यालये तसेच तीन इंजिनियरींग कॉलेजेस, विदर्भ प्रिमियर हाऊसींग कॉलोनी व अन्य हाऊसींग कॉलोनी आहेत. करीता एमआयडीसी येथील सामुहिक सुविधा केद्र येथे बँकेची शाखा उघडल्यास तेथील परिसरांतील लोकांच्या दृष्टीने बँकेची शाखा उघडण्यांत यावी, अशी मागणी औद्योगिक संघटनेने दिनांक २१/१/२०१० चे पत्रान्वये केली.<br>कार्यालयीन पत्र दिनांक ९/२/२०१० अन्वये अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, अमरावती यांना यादृष्टीने पाठपुरावा करण्याची विनंती करण्यांत आली आहे. सभेला अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, अमरावती उपस्थित नसल्यामुळे सदर विषयावर चर्चा होऊ शकली नाही.<br>मा. अध्यक्ष महोदया यांनी अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, अमरावती यांचेशी चर्चा करुन सदर विषय निकाली काढावा, अशी सुचना केली. | अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, अमरावती |

इतर कोणतेही विषय चर्चेसाठी नसल्यामुळे आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष महोदया यांचे परवानगीने सभा समाप्त करण्यांत आली.

स्वा/-
जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र.

स्वा/-
महाव्यवस्थापक,
जि.उ.कें. तथा
सदस्य-सचिव, जि.उ.मि.,अमरावती.